वर्ष : ०५ | अंक: ५२ | मुंबई, मंगळवार १९ नोव्हेंबर २०१९ ते सोमवार २५ नोव्हेंबर २०१९ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

PG 2 उद्धव ठाकरे यांचा अयोध्या दौरा तूर्तास रद्द

3 → पेच सत्तेचा

मराठी माणसाला 'सर्वोच्च' स्थान ← 4

# हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी शिवसेनेचा भाजपवर आक्रमक पवित्रा



## शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पकडले कोंडीत

**'एनडीए'तून बाहेर पडलेल्या शिवसेना खासदारांची बसण्याची जागा विरोधी बाकांवर करण्यात आल्यानंतर शिवसेनेनं आक्रमक पवित्रा घेत संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी भाजपाला कोंडीत पकडलं आहे. राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे पिकांचं प्रचंड नुकसान झालं. त्याबदल्यात शेतकऱ्यांना दिली जाणारी मदत कमी असून, केंद्रानं अतिरिक्त मदत देण्याची मागणी करीत शिवसेनेनं या मुद्यावर लोकसभेत स्थगन प्रस्ताव मांडला. त्याचबरोबर अधिवेशनाला सुरूवात झाल्यानंतर लोकसभेतून सभात्याग केला.**





विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेनेनं राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबत सत्तास्थापन करण्याचा पर्याय स्वीकारला आहे. शिवसेनेच्या निर्णयानंतर भाजपानं शिवसेना 'एनडीए'तून बाहेर पडल्याची घोषणा केली. तसेच शिवसेनेच्या संसद सदस्यांची जागाही बदलण्यात आल्याची माहिती केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिली. भाजपाच्या या भूमिकेनंतर शिवसेना संसदेत आक्रमक झाली आहे.

सोमवार (१८ नोव्हेंबर) पासून संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सुरूवात झाली आहे. राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतमालाचे नुकसान झाले आहे. राज्यपालांनी जाहीर केलेली मदत तोकडी असून, शेतकऱ्यांना २५ हजार रूपये मदत देण्याच्या मागणीसाठी शिवसेना मोदी सरकारविरोधात आक्रमक झाली आहे. शिवसेनेच्या सर्व खासदारांनी संसद परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ आंदोलन केले. तसेच मदतीसाठी लोकसभेत स्थगन प्रस्ताव दिला.

लोकसभेत कामाला सुरूवात झाल्यानंतर शिवसेनेच्या खासदारांनी शेतकऱ्यांना जास्तीची मदत देण्यासाठी अतिरिक्त निधी देण्याची मागणी करीत गदारोळ घातला. तसेच त्यानंतर सभागृहाचा त्याग करत सर्व खासदार बाहेर पडले.

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येलाच शेतकऱ्यांना जास्तीची मदत देण्यासाठी भूमिका घेणार असल्याचं शिवसेनेने स्पष्ट केलं होतं. 'शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठीशी असून अवेळी पावसाने त्यांना किमान २५ हजार रुपये प्रति हेक्टर मदत देण्याची शिवसेनेची मागणी आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्यभरात केलेल्या दौऱ्यांच्या वेळी ही भूमिका मांडली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक मदत मिळाली पाहिजे, अशी शिवसेनेची मागणी असून विविध माध्यमांमधून संसदेत ती आक्रमकपणे मांडली जाईल,' असे राऊत यांनी सांगितले.




# अपहरण करुन दिड कोटींची खंडणी उकडणाऱ्या ५ आरोपींना पुणे पोलिसांनी केले जेरबंद

**पुणे - पोलीसनामा ऑनलाइन - मार्केटयार्ड येथील व्यापाऱ्याचे गुरुवारी रात्री अपहरण करण्यात आले असून अपहरण कर्त्यांनी दीड कोटी रुपयांची खंडणी वसुल केल्यानंतर पुणे सातारा रस्त्यावर या व्यापाऱ्याची सुटका करण्यात आली. गुरुवारी रात्रभर सुरु असलेल्या या ऑपरेशन मध्ये शहर पोलिसांनी शहराच्या वेगवेगळ्या भागातून आतापर्यत ५ जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडे चौकशी सुरु आहे.**




याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका ६५ वर्षाच्या व्यापाऱ्याचा मार्केटयार्डमध्ये गाळा आहे. त्यांचा मुलगा बांधकाम व्यवसायिक आहे. गुरुवारी रात्री हे व्यापारी आपला गाळा बंद करुन घरी जात होते. यावेळी कारमधुन आलेल्या गुन्हेगारांनी वखार महामंडळाजवळून त्यांचे जबरदस्तीने अपहरण केले. त्यांना घेऊन ते अज्ञातस्थळी गेले. त्यानंतर त्यांच्याकडून मुलाचा मोबाईल नंबर घेऊन त्याला फोन करुन दोन कोटी रुपयांची खंडणीची मागणी केली. पैसे दिले नाही तर वडिलांना जीवे मारण्याची धमकी दिली.

त्यांनी तातडीने अपहरणाची ही माहिती गुन्हे शाखेला रात्री दिली. भर रस्त्यातून व्यापाऱ्याचे खंडणीसाठी अपहरणाची माहिती मिळताच गुन्हे शाखा खडबडून जागी झाली.

गुन्हेगारांनी मुलाशी बोलणे केल्यावर दीड कोटी रुपये आणून देण्याचे सांगण्यात आले होते. ही रक्कम मध्यरात्री एका ठिकाणी पैसे आणून देण्यास सांगितले होते. त्यानुसार एका बॅगेत पैसे ठेवून ती बॅग तेथे ठेवण्यात आली. यावेळी पोलीस सभोवताली पाळतीवर होते. मात्र, गुन्हेगारांनी पैशाची बॅग घेऊन धुम ठोकली.

पैसे मिळाल्यानंतर खंडणीखोरांनी आज सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास या व्यापाऱ्याला पुणे सातारा रोडवरील केळवडे येथे सोडून ते पळून गेले. या व्यापाऱ्याचे डोळे बांधले असल्याने त्यांना आपण कोठे आहोत, हे कळत नव्हते. त्यांनी तेथून जाणाऱ्या एकाकडे चौकशी केली. त्यानंतर त्यांनी त्याच्याकडील मोबाईलवरुन मुलाशी संपर्क करुन आपल्याला सोडले असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी शहरातील वेगवेगळ्या भागातून याप्रकरणातील ५ जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडे चौकशी सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# भाईंदरमध्ये सेनेच्या विभागप्रमुखाला भाजप गटनेत्याकडून बेदम मारहाण

**भाईंदर** – मीरा-भाईंदर महापालिकेतील भाजप गटनेते हसमुख गेहलोत यांनी मुलांच्या खेळण्यावरून झालेल्या वादात शिवसेनेचे विभागप्रमुख सतीश अंचेकर (५७) यांना मारहाण केली. याप्रकरणी नवघर पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे. तर, मुलांच्या खेळण्याचे निमित्त असून राजकीय आणि सोसायटीचा वाद यामागे आहे, असे अंचेकर याचे म्हणणे आहे. भाईंदर पूर्वेला गोल्डन नेस्ट वसाहतीजवळ विधी हाइट्स नावाची इमारत आहे. या इमारतीत शिवसेनेचे विभागप्रमुख अंचेकर राहत असून ते गृहनिर्माण संस्थेचे सचिव आहेत. याच इमारतीत भाजप गटनेते हसमुख गेहलोत यांची सदनिका आहे. मात्र, गेहलोत हे कुटुंबीयांसह शेजारच्या विधी अपार्टमेंटमध्ये राहतात. अंचेकर यांच्या म्हणण्यानुसार, रविवारी सायंकाळी गेहलोत यांचा लहान मुलगा हिरण्य (११) हा अन्य दोघा मुलांसह विधी हाइट्स इमारतीत खेळण्यासाठी आला होता. शेजारी राहणाऱ्या लहान मुलाने बाजूच्या इमारतीतून मुले येतात आणि आम्हाला



खेळू देत नाहीत, अशी तक्रार केली. त्यावरून मी गेहलोत व अन्य मुलांना तुम्ही तुमच्या इमारतीच्या आवारात जाऊन खेळा, असे सांगितले. काही वेळाने गेहलोत हे पत्नी, मुलासह आले आणि मुलाला शिवी का दिली म्हणून दरडावू लागले. मी शिवी कशाला देऊ, असे सांगूनही त्यांनी मला बॅटने रक्त निघेपर्यंत मारहाण केली, असे अंचेकर म्हणाले. याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यास गेलेल्या अंचेकर यांना पोलिसांनी सुरुवातीला गुन्हा दाखल करून घेण्यास नकार देत तक्रार अर्ज द्या, असा पवित्रा घेतला होता. रक्त निघत असूनही पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास नकार दिल्याने थेट खासदार राजन विचारे आदींनी चांगलीच कानउघाडणी केली. त्यानंतर पोलिसांनी गेहलोत यांच्याविरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल केला.

### शिवीगाळ केल्याचा गेहलोत यांचा आरोप

**गेहलोत यांनी मात्र अंचेकर यांनी मुलास शिवीगाळ केली. त्याच्यासोबतच्या मुलांनीही तसे त्यांच्यासमोरच सांगितले. माझी सदनिका त्या इमारतीत आहे. मुलांना खेळण्यास मनाई करणे, शिवीगाळ करणे निंदनीय आहे. अंचेकर अन्य कारणे सांगून दिशाभूल करत असल्याचे गेहलोत म्हणाले.**

मुलांचे निमित्त गेहलोत करत असून याआधीही त्यांनी तीन वेळा असे प्रकार केले आहेत. विधी हाइट्सच्या तळमजल्यावर बिल्डरच्या संगनमताने दोन सदनिका बेकायदा बांधल्या होत्या. त्या आम्ही तक्रारी करून तोडायला लावल्या. त्याचा रोष आहे. शिवाय, शिवसेनेचे पदाधिकारी असून गेहलोत आता स्थानिक नगरसेवक आहेत. मुलांचे निमित्त असून शिवीगाळ केलेली नाही, असे अंचेकर म्हणाले.

# मीरा-भाईंदरमध्ये वाहतूक पोलिसंची धडक कारवाई





मिरा भाईंदर परिसरात ठिकठिकाणी अवैध गाड्या, जूनाट झालेल्या गाडया तसेच अवैध पार्कींग याला आळा घालण्यासाठी वहातूक विभागाचे नव्याने नियुक्ती झालेले वरिष्ठ पोलिस निरिक्षक अनिल पवार यांच्या सहकार्याने मिरा भाईंदर परिसरातील अनेक अवैध जूनाट भंगार झालेल्या गाडया उचलून नेण्यांत आल्या स्वतः या मोहीमेमध्ये भाग घेऊन मोठया प्रमाणात कारवाई अनिल पवार व त्यांचे सहकारी करीत आहे.

दिवाळीचा कार्यकाळ थोडे थांबून पून्हा नव्या जोमाने सदरची कारवाई सुरु झाली आहे. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर मधे नेहमीच वहातूक वेगावर वहातूकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई ची मोहीम राबवण्यांत येते. यासाठी २५ पोलिसांचे विविध ५ गट बनवून हि धडक मोहीम नियमित सूरु आहे. वाहतूकीचे नियम मोडणाऱ्यांचे कंबरडेच या पथकाने मोडले आहे. यामुळे मिराभांईदर परिसरात काही का होईना परंतू वाहतूकीवर थोडा अंमल दिसत आहे.

# मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत भीमसेन जोशी रुग्णालयात रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय

### अवहेलनेचा प्रत्यक्ष महिला डॉक्टरांना ही बसला याचा फटका

**मीरा रोड : मीरा-भाईंदर महापालिकेच्या आणि सध्या शासनाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात नागरिकांना गैरसोयीचा नेहमीच अनुभव आला आहे. जोशी रुग्णालयात योग्य उपचार आणि खोली न मिळालयने या महिला डॉक्टरला खाजगी रुग्णालयात दाखल व्हावे लागले.**

सामान्य नागरिकांचा वाईट अनुभव असतानाच पालिकेच्या वैद्यकीय सेवेत नॅशनल अर्बन हेल्थ मिशन अंतर्गत कार्यरत असणाऱ्या डॉ. तेजस्विनी लांजेकर यांनाही पालिकेच्या कारभाराचा फटका बसला. मीरा रोडच रसाज येथील आरोग्य केंद्रात त्या कार्यरत असून प्रकृती बिघडल्यामुळे त्या रजेवर होत्या. गेल्या सोमवारी त्या कामावर पुन्हा रुजू झाल्या. मात्र पकृती बिघडल्याने त्यांना कर्मचाऱ्यांनी आधी पालिकेच्या मीरा रोड येथील इंदिरा गांधी रुग्णालयात नेले. रक्ततपासणी केल्यावर तेथील डॉक्टरांनी भाईंदरच्या जोशी रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला. पण पालिकेची रुग्णवाहिकाही त्यांना देण्यात आली आहे. डॉ. लांजेकर यांना रिक्षातून जोशी रुग्णालयात नेले.

जोशी रुग्णालयातही त्यांना उपचार सुरु करण्यासाठी सुमारे तासभर ताटकळत ठेवण्यात आले. त्यांना स्वतंत्र खोली देण्याऐवजी जनरल वॉर्डमध्येच दाखल केले. विशेष म्हणजे, स्वतंत्र खोल्या असूनही त्यातील काहींमध्ये सामान भरलेले आहे, तर काहींच्या चाव्याच स्वत:कडे ठेवल्याने डॉ. लांजेकर यांना खोलीच मिळाली नाही. त्यानंतर उपचारांअभावी तसेच सुविधा नसल्याने रात्री उशिरा त्यांना दुसऱ्या खाजगी रुग्णालयात नेऊन दाखल करण्यात आले. चार दिवस त्या आजारी असल्याने आल्या नव्हत्या. सोमवारी घडलेला हा प्रकार नुकताच उघड झाला आहे. महापालिका आयुक्त बालाजी खतगावकर आणि उपायुक्त डॉ. संभाजी पानपट्टे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांच्याकडुन प्रतिसाद मिळाला नाही. तर प्रभारी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमोद पडवळ यांनी, नेमका काय प्रकार घडला आहे याची माहिती घेतो, असे सांगितले.

# संपादकीय... काळजीची बिळे


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

राजकारणाने आपल्या मनोव्यापारांमध्ये एवढी प्रचंड जागा सध्या पटकावलेली आहे, की आपल्या पुढ्यात आ वासून उभी असलेली आणि थेट आपल्या आयुष्याशी निगडित असलेली अनेक संकटे आपल्याला दिसतही नाहीत. देशाच्या अर्थव्यवस्थेवर उदासीचे गडद ढग दाटून आलेले आहेत, या कृष्णमेघांमधून उद्या महागाई, बेकारी, हतबलता आणि निराशेच्या मुसळधार पावसाचा मारा होणार असल्याचे वास्तव समोर उभे ठाकलेले आहे. कांद्याने शंभरी गाठलेली तर आपण पाहतोच आहोत. देशातील जनतेने ३७० कलम, राम मंदीर, पाकिस्तानला तंबी, आपल्या पंतप्रधानांचा जागतिक स्तरावरील दबदबा अशा भावनिक मुद्द्यांची पक्वान्ने खात, अभिमानाचे ढेकर देत राहावे अशी सरकारची इच्छा दिसते.

परंतु सांख्यिकी विभागाने सोमवारी जाहीर केलेली औद्योगिक उत्पादनांची घसरलेली आकडेवारी ही आजचे गंभीर वास्तव सांगणारी आणि त्याहूनही गंभीर अशा भविष्याचा इशारा देणारी आहे. दुर्दैव असे, की खुद्द सरकारही यातील गांभीर्य समजून घेण्याच्या मनस्थितीत दिसत नाही. गेल्या आठ वर्षातील ही सर्वात मोठी घसरण असून उत्पादन निर्देशांक उणे १.४ टक्के एवढा खाली गेला आहे. सोप्या भाषेत सांगायचे, तर देशातील औद्योगिक उत्पादन कमालीचे कमी झाले आहे. लोकांकडे पैसे नाहीत म्हणून मालाला उठाव नाही आणि मालाला उठाव नाही म्हणून उत्पादन कमी. अतिरिक्त पावसाने दिलेल्या फटक्याची या संकटात भर पडली असून देशाचे आर्थिक भविष्य त्यामुळे अधिकच काळेकभिन्न दिसत आहे.



गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात जो तुटीचा अपेक्षित आकडा केंद्रीय अर्थमंत्र्यांनी दिलेला होता, त्यातील ९२ टक्क्यांपर्यंत आपली अर्थव्यवस्था आताच पोचली आहे आणि अद्याप पाच महिने शिल्लक आहेत, यावरून हे संकट किती गंभीर आहे याची कल्पना येऊ शकते. सांख्यिकी विभागाने प्रसृत केलेली ही आकडेवारी असल्याने, राजकीय हेतू वगैरेचा आरोप करण्यासही जागा नाही. वस्तूंचे उत्पादन, वीजनिर्मिती आणि खनिजउत्पादन या तीन प्रमुख क्षेत्रांना ही झळ बसल्याने त्याचा परिणाम खोलवर झालेला आहे. याचा एक अर्थ असा होतो, की आर्थिक परिस्थिती सावरण्यासाठी म्हणून जे जे उपाय केले, ते सर्व एक तर व्यर्थ ठरले आहेत किंवा अपुरे तरी पडले आहेत. अस्मिता, देशभक्ती, अभिमान वगैरेंना चुचकारणारी विधाने नेते सर्रास करीत असताना देशाच्या आर्थिक स्थितीबद्दलचे वास्तव काय आहे ते सांगण्याची हिंमत पंतप्रधानांसह कोणीही करताना दिसत नाहीत. ज्या ज्या अर्थतज्ज्ञांनी सरकारला ते सांगायचा प्रयत्न केला, त्यांना सरकारने बाहेरचा रस्ता दाखवला हे आपण पाहतो आहोत. गेल्या दोन वर्षात रघुराम राजन यांच्या पाठोपाठ उर्जित पटेल, अरविंद पांगारिया, विरल आचार्य, अरविंद सुब्रमणियम अशा अनेक उच्चपदस्थांनी वेगेवगळी कारणे सांगून स्वतःची सोडवणूक करून घेतली, कारण सरकार अर्थव्यवस्था आजारी असल्याचे मान्यच करायला तयार नाही. उपाययोजना म्हणून सरकारने काही पावले उचललीही, परंतु हे उपाय तोकडे पडले असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. आहेत. उदाहरणार्थ कंपनी करात सरकारने कपात केली, विदेशी गुंतवणुकीवरील करही कमी केला, मात्र त्याचा फायदा केवळ मूठभरांना झाला आणि अर्थव्यवस्थेला चालना मात्र मिळू शकली नाही. व्याजदर थोडा कमी करण्याचे पाऊलही दर काही महिन्यांनी उचलले जाते, हेतू असा की, मोठ्या प्रमाणावर कर्जे घेतली जावी, गुंतवणूक वाढावी आणि त्यातून उत्पादन वाढावे. परंतु याचाही काही उपयोग झाल्याचे दिसत नाही. उलट, बँकांमधील ठेवी आणि पैसा यावरील व्याज कमी होऊन सामान्यांना त्यामुळे तोशीसच सहन करावी लागली आहे. विशेषतः निवृत्तांचा असा मोठा वर्ग आहे, ज्यांचा घरखर्च मुदत ठेवींवरील व्याजावर चालतो, त्यांना याची मोठी झळ बसत आहे. दुर्दैवाने जागतिक स्तरावरही निराशेचीच स्थिती आहे. चीन, अमेरिकेतही आर्थिक आघाडीवर फार उत्साहाची स्थिती नाही, ब्रेक्झिटचा तिढा कायम आहे. जागतिक मंदीच्या काळातही भारतीय अर्थव्यवस्थेला फार मोठा धक्का बसला नाही, कारण देशाच्या अर्थव्यवस्थेत अंगूभत अशी एक बचाव यंत्रणा तयार झालेली होती. नोटबंदीनंतरच्या काळात ती यंत्रणा कोलमडून पडली आणि पर्यायी व्यवस्था मात्र निर्माण होऊ शकली नाही. आर्थिक संकट एका दिवसात पुढे उभे ठाकत नसते, ते हळुहळू काजळी धरते. त्याची चाहूल लागूनही सरकार जर ठोस उपाय करणार नसेल आणि 'निद्रेच्या खोपटी, काळजीची बिळे, होणार वाटोळे, होईल ते' अशी 'मर्ढेकरी' भूमिका घेणार असेल तर आपणही फक्त सोशल मिडियावर राजकीय टिका-टिप्पणी करत राहू.

## पेच सत्तेचा

**लोकशाही हा स्वस्तात उरकणारा प्रकार नाही. त्यासाठी आर्थिक, बौद्धिक आणि मानसिक अशी तिहेरी किंमत मोजावी लागते. या तुलनेत हुकूमशाही वा एकाधिकारशाही सोपी आणि स्वस्त..**

महाराष्ट्रात नवनव्या सत्ता-समीकरणांसाठी व्याकूळ झालेल्यांकडून केले जाणारे युक्तिवाद समान आहेत. एक म्हणजे जनतेचे हाल आणि दुसरा शहाजोग प्रश्न म्हणजे- 'पुन्हा निवडणुकांचा खर्च जनतेच्या माथ्यावर मारायचा का?' हा. या दोन मुद्द्यांच्या आड सर्व राजकीय पक्ष आपापली सत्तालालसा भागवीत असतात आणि वाटेल त्याच्याशी वाटेल तेव्हा सोयरीक करीत असतात. पण हे दोन्हीही मुद्दे भंपकपणाची भलामण करणारे आहेत.

राज्यात गेले दोन आठवडे वा अधिक काळ मुख्यमंत्री वा अन्य मंत्री नाहीत, म्हणून कोणाचे प्राण कंठाशी आले असे झालेले नाही. ज्यांचे आले असे सांगितले जाते ते स्वत: एक तर मंत्री पदाचे इच्छुक तरी आहेत किंवा त्या पदाच्या महिरपीस लोंबकळणारे तरी आहेत. प्रत्येक सरकार आपापला एक फौजफाटा पोसत असते. त्यात मंत्र्यांना नियत सरकारी सेवकांखेरीज विशेष अधिकारी (ऑफिसर ऑन स्पेशल डयूटी) अशी काही पदे भरता येतात. या मंडळींच्या पदनामात विशेष अधिकारी आदी नमूद केले गेले असले तरी यातील बहुतांश मंडळी मंत्र्यांचे 'वरचे' उद्योग सांभाळण्याचे महत्त्वपूर्ण काम करतात. शंकरापेक्षा ज्याप्रमाणे नंदीच जास्त अडून बसतो त्याप्रमाणे या विशेष अधिकाऱ्यांचे प्रस्थ वाढलेले असते. मंत्रालयाचा ज्यांना अनुभव आहे अशांना वर्षांनुवर्षे या नंदी पदावर प्राणप्रतिष्ठा झालेल्यांचा अनुभव असेल. हे कर्मचारी आणि व्यापक जनहित यांचा काडीमात्रही काही संबंध नाही. असलाच तर उलट तो जनहिताच्या आडकाठीचाच. तेव्हा राज्यात मंत्रिमंडळ नसल्यामुळे हा वर्ग सुतकात गेला असल्यास आश्चर्य नाही. मंत्रिमंडळ आणि हे हितसंबंधी यांचा थेट संबंध असतो. तेव्हा मंत्रिमंडळच नसल्यास या मंडळींच्या पोटावर पाय येणार हे उघड आहे आणि त्यामुळे त्यांना पोटदुखी होणार हेही सत्य आहे.

या संदर्भात आणखी एक विदारक सत्य नमूद करायला हवे. ते हे की सरकार कोणत्याही पक्षाचे असो, सत्ताधाऱ्यांना सांभाळणारे हे झारीतील शुक्राचार्य तेच असतात. पक्ष, त्याचा ध्वज वा अन्य काही किरकोळ मुद्दे यातच काय तो बदल. एरवी सारे काही 'तेच ते नि तेच ते'. हे असे होते याचे कारण नव्या आशेने मंत्रिमंडळात सहभागी होणारा सुरुवातीस भले जग बदलण्याची ईर्षा बाळगतो. पण पुढे व्यवस्थेच्या रामरगाडय़ात पिळवटला गेला की शांत होतो आणि जगाचे भले नाही आपण करू शकत पण निदान आपले तरी ते करून घ्यावे ही इच्छा त्याच्या मनी मूळ धरू लागते. अशा वेळी सत्ता कशी राबवायची याचे मुरब्बी ज्ञान असलेल्यांची गरज लागते. त्या वेळी हा 'अनुभवी' अधिकारी वर्ग कामी येतो आणि नव्या मंत्र्यास स्वकल्याणाची 'वाट' दाखवतो. सत्ताधारी पक्ष बदलला तरी व्यवस्थेत काहीही बदल होत नाही तो यामुळे. राज्यात सध्या तूर्त मंत्रिमंडळ नाही. अशा अवस्थेत पाण्यातून बाहेर काढलेल्या माशाप्रमाणे या वर्गाच्या जिवाची तगमग होणे साहजिक. हा बनेल आणि बनचुका वर्ग आणि नवे सत्ताकांक्षी



त्यामुळे सुरात सूर मिसळून सध्या गळा काढताना दिसतात. या दोघांचा मिळून एक समान प्रश्न समोर येतो.

''गरीब जनतेवर मग पुन्हा निवडणुका लादायच्या काय'' किंवा ''आपल्या देशाला अशा सारख्या निवडणुका परवडणार आहेत काय'' वगैरे. हे प्रश्न आधीचा भंपकपणा अधिक व्यापक करतात. त्याचे उत्तर देण्याआधी एक बाब निर्विवादपणे मान्य करायला हवी की लोकशाही हा स्वस्तात उरकणारा प्रकार नाही. त्यासाठी आर्थिक, बौद्धिक आणि मानसिक अशी तिहेरी किंमत मोजावी लागते. या तुलनेत हुकूमशाही वा एकाधिकारशाही सोपी आणि स्वस्त. त्याचे आपल्याकडे अनेकांना अलीकडे आकर्षण वाटू लागले असले तरी या दोन्ही प्रकारांत एखादी व्यक्ती वा एखादापक्ष सोडले तर देशासह अन्य सर्वांचे नुकसानच होते. त्याची अनेक उदाहरणे इतिहासाच्या पानांत आणि देशोदेशीय वर्तमानात आढळतील. त्यावरून काही धडा शिकायचा असेल तर तो एकच असेल : लोकशाहीची किंमत देण्याची तयारी.

तेव्हा निवडणुकांचा खर्च परवडत नाही हे कारण काही वाटेल ती जोडतोड आणि तोडफोड करण्याचे समर्थन असू शकत नाही. हे असे जोडतोडीचे प्रयोग आपल्याकडे अनेक होत आले आणि आताही होत आहेत. हरियाणा हे त्याचे ताजे उदाहरण. 'जननायक जनता पार्टी' अशा आदर्शवादी नावाच्या पक्षाने नरेंद्र मोदी आणि भाजप यांच्या विरोधाच्या मुद्दय़ावर निवडणुका लढवल्या. दुष्यंत चौताला हे या पक्षाचे सर्वेसर्वा. हरियाणाच्या विख्यात 'लाल' त्रयीतील देवीलाल यांचे ते पणतू. देवीलाल यांचे चिरंजीव तुरुंगवासी ओमप्रकाश चौताला यांचे तुरुंगवासी चिरंजीव अजय चौताला हे या दुष्यंताचे तीर्थरूप आणि ही त्या कुटुंबाची देदीप्यमान परंपरा. अमेरिकाशिक्षित या दुष्यंताने निवडणूक प्रचारांत मोदी, अमित शहा यांच्याविषयी टीकेची जी झोड उठविली ती शिमगा सणाच्या सांस्कृतिक वर्णनास साजेशी होती. तथापि सत्ताशकुंतलेच्या प्राप्तीसाठी भाजपची कमतरता भरून काढण्यास वर पुन्हा हेच दुष्यंत पुढे सरसावले. आपल्या भूमिकेत इतका बदल केल्यानंतर त्यांचे समर्थन हेच होते : लोकशाही वाचवणे. तेथे जे काही झाले त्यामुळे या चौताला कुटुंबाची धन झाली याव्यतिरिक्त यामुळे लोकशाहीचे भले कसे काय झाले? केंद्रात सत्ताधारी भाजपने संवेदनशील अशा जम्मू-काश्मिरात हेच केले. मुफ्ती महंमद सद आणि आता त्यांची पीपल्स डेमॉक्रॅटिक पार्टी (पीडीपी) ही देशद्रोही असल्याचा भाजपचा वहीम होता. त्यामुळे त्या पक्षावर पाकिस्तानशी संधान असल्याचा आरोप भाजपकडून अनेकदा झाला. भाजपसारख्या देशप्रेमी, राष्ट्रवादी भावनांनी मुसमुसलेल्या पक्षाकडूनच असा आरोप झाल्याने त्यामागे निश्चितच तथ्य असणार. पण पुढे याच पीडीपीशी भाजपने हातमिळवणी केली. कोंबडी आणि खाटीक यांत युती व्हावी इतकी ही बाब आश्चर्यकारी. त्यावर अनेकांनी तसे आश्चर्य व्यक्त केल्यावर भाजपची प्रतिक्रिया हीच होती : लोकशाहीरक्षणार्थ युती. पण पुढे या पक्षाशी भाजपचे फाटले आणि ती युती तुटली. त्या वेळी या युतीभंगाने लोकशाही संकटात आली, असे भाजपने म्हणावयास हवे होते. पण तशी कबुली दिली गेल्याचे स्मरत नाही. असे अनेक दाखले देता येतील. त्यातून हाच मुद्दा अधोरेखित होतो.

सत्ता बळकावण्याची निर्लज्ज तडजोड आणि लोकशाही यांचा तिळमात्रही संबंध नाही. महाराष्ट्रात हे टाळायचे असेल तर पुन्हा निवडणुका हाच पर्याय असायला हवा. अन्यत्र भाजपने असेच केले होते, सबब सेनेलाही तसे करू द्या या युक्तिवादात अर्थ नाही. त्याच त्या ऐतिहासिक चुका आपण करत राहणार असू तर खरी लोकशाही पुढे जाणार कशी आणि तीत सुधारणा होणार कशा? सोनिया गांधी ते राहुल गांधी व्हाया शरद पवार आणि काँग्रेस/राष्ट्रवादी यांच्याविरोधात वाटेल ते असभ्य, अश्लाघ्य आणि आचरट आरोप/टीका केल्यानंतर आणि अल्पसंख्य, बाबरी मशीद, कलम ३७० आदी मुद्द्यांवर सेनेची भूमिका जगजाहीर असतानाही या दोघांत युती होऊच कशी शकते? आणि झाली तरी तीत लोकशाहीचे भले कसे?

म्हणून सध्याचा तिढा सोडवण्यासाठी निवडणुका हाच पर्याय आहे. त्यातही निवडणुकांआधीच या राजकीय पक्षांनी आपण कोणाशी युती करू शकतो, कोणाशी नाही, हे आधीच स्पष्ट करावे. नंतर उगाच लोकशाहीरक्षणाचा भंपक दावा नको.

# ठाण्यात वाहनचालकांच्या बेशिस्तीला ब्रेक



ठाणे शहरात विशेषत नौपाडा, पाचपाखाडी, चरई यांसारख्या भागांत रस्त्याच्या कडेला मन मानेल त्या पद्धतीने वाहने उभे करत वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरणाऱ्या वाहनचालकांविरोधात वाहतूक पोलिसांनी जोरदार मोहीम हाती घेतली असून ही कारवाई करत असताना होणारे वाद टाळण्यासाठी अशा वाहनांचे छायाचित्र काढून त्यांना ई-चलानद्वारे दंड आकारला जात आहे.

नौपाडा तसेच आसपासच्या परिसरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर कोणत्या वेळेत कोठे वाहने उभी करावीत याविषयी ठरावीक नियमावली आहे. मात्र, अनेकदा या नियमांची वाहनचालकांना माहिती नसते. तसेच या भागात पार्किंग धोरण आखण्याची तयारीही अनेक वर्षांपासून महापालिका करीत आहे. ही नियमावली आणि त्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या जागांची अंमलबजावणीही कागदावर आहे. तरीही वाहतूक पोलिसांनी आखून दिल्यानुसार सम-विषम पद्धतीची पार्किंग व्यवस्था आणि वेळा पाळणे वाहनचालकांना बंधनकारक आहे. असे असताना अनेक वाहनचालक या नियमांचे पालन करत नाहीत, असे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. नौपाडा, गोखले रोड, ठाणे स्थानक परिसरात चारचाकी वाहनचालकांकडून बेशिस्तपणे वाहने उभी केली जातात. या वाहनांवर कारवाई करताना अनेकदा वाहतूक पोलीस आणि वाहनचालकांमध्ये वाद होत असतात. या वादामुळे पोलिसांवर हल्ल्याचेही प्रकार यापूर्वी घडले आहेत. त्यामुळे या परिसरात ई-चलान यंत्रणेची प्रभावी पद्धतीने अंमलबजावणी केली जात आहे. ई-चलान यंत्रणेद्वारे आकारण्यात येणारा दंड हा थेट वाहनचालकांच्या मोबाइल क्रमांकावर संदेशाद्वारे पाठवला जात आहेत. त्यामुळे नियमभंग करणाऱ्या चालकाला दंड भरण्याव्यतिरिक्त पर्याय उरत नसल्याने वाहतूक पोलीसही समाधान व्यक्त करीत आहेत.

# मानसिक छळ प्रकरणी १५ डॉक्टरांवर गुन्हा दाखल

**पालघर :** पालघरमधील डॉ. ढवळे मेमोरियल रुग्णालयाच्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रशिक्षण घेणाऱ्या एका महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरचा रूग्णालयाच्या १५ वरिष्ठ डॉक्टरांनी मानसिक छळ केल्याप्रकरणी पालघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. सर्व आरोपी डॉक्टर अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

नाशिकची रहिवासी असलेल्या प्रियंका शुक्लानेएमडी होमियोपॅथी पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. ती डॉक्टर ढवळे रूग्णालयाच्या वैद्यकीय महाविद्यालयात दोन दिवसापूर्वी रुजू झाली होती.येथे प्रशिक्षण घेत असताना रुग्णालयात १४ नोव्हेंबर रोजी बैठक झाली. यातील काही वरिष्ठांसोबत आपली ओळख करून घेत असताना त्यातील काही डॉक्टरांनी गुरूवारी रात्री तिचा मानसिक छळ केला. यामुळे या विरोधात तिने या सर्व वरिष्ठ डॉक्टरांच्या विरोधात तक्रार दाखल करण्याचे ठरवले.

तिने शुक्रवारी तिच्यासोबत घडलेला प्रकार पालघर पोलीस ठाण्यात सांगितला. मात्र,या डॉक्टरांनी तक्रार करू नये म्हणून तिच्यावर दबाव टाकण्यास सुरूवात केल्याचे कळते. मात्र तिच्या नातेवाईकांनी तिला दिलेल्या पाठिंब्यामुळे व असला घृणास्पद प्रकार इतर डॉक्टरसोबत घडू नये म्हणून महिला डॉक्टरांच्या फिर्यादीवरून पालघर पोलिसांनी १५ डॉक्टरांविरोधात महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक कायदा कलम ४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक सुजीत ठाकूर हे पुढील तपास करीत आहेत. त्यांनी आतापर्यंत दोन डॉक्टरांचे जबाब नोंदवले असल्याचे 'लोकमत' ला सांगितले.



डॉ. प्रियंका शुक्ला या विद्यार्थीनीने आपले रॅगिंग झाल्याबाबत पोलिसात तक्रार दाखल करण्यापूर्वी महाविद्यालयातील कुठल्याही अधिकाऱ्यांकडे आपली भूमिका मांडली नसल्याचा खुलासा ढवळे रूग्णालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आनंद कापसे यांनी केला आहे.

नवीन बॅचच्या स्वागतासाठी रविवारी फ्रेशर्स पार्टी होणार असल्याने १४ नोव्हेंबर रोजी एक बैठक झाली. यात आपल्याला मानसिक त्रास देण्यात आला अशी डॉ. शुक्ला यांनी पालघर पोलिसात तक्रार दाखल करण्यापूर्वी कुठल्याही अधिकाऱ्यांकडे आपली भूमिका मांडली नाही.अथवा त्यांना भेटण्यासाठी गेलेल्या प्राचार्य व अँटी रॅगिंग सेनेच्या अध्यक्ष यांच्याशी बोलण्यास त्यांनी नकार दिल्याचे प्रभारी प्राचार्यांनी म्हटले आहे. या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांशी संस्थेने संपर्क साधला असता या घटनेमध्ये कोणत्याही प्रकारचे रॅगिंग झाले नसल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. बैठकीमध्ये कोणत्याही प्रकारचे अश्लील संभाषण, कृती झाली नाही असे सर्व विद्यार्थ्यांनी सांगितले आहे. ही बैठक हसत-खेळत झाल्याचेही ते म्हणाले. ढवळे संस्था विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पुरेशी काळजी घेत असल्याचेही डॉ. कापसे यांनी स्पष्ट केले.

# घरे भाड्याने देण्यापूर्वी पोलिसांना कळविणे बंधनकारक

**नालासोपारा :** पालघर जिल्ह्यातील विशेषत: वसई तालुक्यात आणि नालासोपारा शहरात नायजेरियन, बांगलादेशी आणि इतर परकीय नागरिकांचे वास्तव्य वाढते आहे. नायजेरियन नागरिकांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि अंमली पदार्थांची तस्करी यामुळे नालासोपारा शहरातील पोलीस ठाण्यामध्ये गेल्या चार महिन्यात ४ ते ५ नायजेरियनना अटक करून कोट्यवधींचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. या सर्वांवर लगाम घालण्यासाठी पालघर जिल्हाधिकारी आणि पालघर पोलिसांनी कंबर कसली आहे.



नायजेरियन आणि बांगलादेशी नागरिकांचे गुन्हेगारीचे वाढते प्रमाण पाहून या नागरिकांना घरे भाड्याने देण्यापूर्वी त्यांची माहिती स्थानिक पोलिसांना देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसे न केल्यास स्थानिक नागरिकांवर भारतीय दंड संहिता कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल होणार असल्याचेही पोलिसांनी सांगितले.

वसई तालुक्यातील नालासोपारा शहरामध्ये मोठ्या संख्येने नायजेरियन आणि इतर परकीय नागरिक वास्तव्यास येत आहेत. वसई, मीरा रोडमध्ये स्वस्त दरात सदनिका उपलब्ध होत असल्याने येथे त्यांचा या भागात लोंढा वाढतो आहे. याव्यतिरिक्त छुप्या पद्धतीने देखील परदेशी नागरिक वास्तव्य करत असल्याचे पोलिसांना निदर्शनास आले आहे. त्यातील अनेक नागरिक हे मादक पदार्थांच्या तस्करीत आणि लॉटरी फसवणुकीच्या गुन्ह्यात सापडल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यामुळे स्थानिक नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणावर उपद्रव सहन करावा लागतो आहे. या गुन्हेगारीवर आळा बसण्यासाठी पालघर पोलिसांनी एक मोहीम हाती घेतली आहे. पोलिसांनी जिल्हाधिकाऱ्यांना विनंती करून भाडेतत्त्वावर घरे देण्यासाठी नियमावली बनविण्याची विनंती केली होती. त्यानुसार या नायजेरियन नागरिकांवर अंकुश ठेवण्यासाठी पालघर पोलिसांनी ठोस पाऊले उचलली आहेत.

# मिरा भाईदर परिवहन सेवा क्र. ०७, १४, २३ सुरु करा – रोहिदास पाटील

**भाईदर. (प्रतिनिधी) – मिरा भाईदर परिवहन सेवा क्र. ०७, १४, २३ सुरु करा अशी लेखी मागणी मिरा भाईदर महानगरपालिका सभागृह नेता रोहिदास पाटील यांनी आयुक्त बालाजी खतगांवकर यांच्या कडे केली आहे.**



यावेळी पाटील म्हणाले की, नागरिकांच्या येण्याजाण्याची सोय व्हावी म्हणून मिरा भाईदर महानगरपालिकेने परिवहन सेवा सुरु केली पण वाढत्या नवीन नागरी वसाहत भागात परिवहन सेवा देणे आपले कर्तव्य आहे. गोल्डन नेस्ट ते काशिमिरा या हायवे च्या पूर्व भागात अर्थात सिनेमॅक्स परिसर, रामदेव पार्क, या भागात मोठ्या प्रमाणावर नागरी वसाहत वाढत आहे. तसेच सर्वसामान्य नागरिक, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यांना रिक्षाचे भाडे परवडत नसल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. त्यामुळे लवकरात लवकर परिवहन सेवा सुरू करण्याची मागणी होत आहे. त्यानुषंगाने परिवहन सेवा क्र. ०७, १४, व २३ सुरु करा असे पाटील यांनी सांगितले आहे. नागरिकांची सोय म्हणून मिरा भाईंदर परिवहन सेवा सुरु केली परंतु, मधल्या काळात परिवहन सेवा बस क्र. ०७, १४, व २३ या सेवा मनपा ने बंद केल्या. आज शहरात वाढती लोकसंख्या लक्ष्यात घेता पूर्वरत सुरु होणे गरजेचे आहे. या सेवा बद्दल फक्त लवकर सुरु होईल असे सांगण्यात येते प्रतेक्षात मात्र सुरु होत नाही. आता पावसाळा संपला आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जोडणारी परिवहनची सेवा ही एक सामाजिक बांधिलकी निर्माण करणारी सेवा आहे. शालेय, महाविद्यालयीन, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्येच्या मंदिरात जाण्यासाठी विद्यार्थी वर्गासाठी हक्काचे वाहन म्हणजे आपली परिवहन सेवा आहे. त्यामळे तिन्ही मार्गावरच्या बस सेवा सुरु होणे आवश्यक आहे असे पाटील यांनी सांगितले. बस क्र. ०७ हि भाईंदर पूर्व ते वर्सोवा ब्रिज पर्यंत, बस क्र. १४ हि भाईंदर



पूर्व ते बोरीवली पूर्व मागाठणे पर्यंत तर बस क्र. २३ हि भाईंदर पूर्व ते रॉयल कॉलेज पर्यंत प्रवास करत होत्या. त्यामुळे सकाळी कार्यालय कडे जाणारे चाकरमानी, तर महाविद्यालयात जाणारे विद्यार्थ्यांना महाविद्यालात जाण्यासाठी तसेच परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी हि बस सेवा उपयोगी पडत होती, असे पाटील यांनी सांगितले.

तर यावेळी परिवहन सेवा अतिरिक्त आयुक्त डॉ. सुनील लहाने म्हणाले की, याबाबत लवकरत लवकर योग्य निणऱ्य घेऊन केलेल्या मागणीनुसार बस सेवा सुरु करण्याचे आदेश देऊ असे सांगितले.

# तीन बोगस डॉक्टरांवर पालिकेची कारवाई, आरोग्य विभागाला जाग

**नालासोपारा : वसई तालुक्यात विशेषत: नालासोपाऱ्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट आहे. बोगस डॉक्टरांबाबत महापालिकेचा आरोग्य विभाग खडबडून जागे होत वसई- विरार महापालिकेचे आयुक्त बळीराम पवार यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार अधिकाऱ्यांनी बोगस डॉक्टरांवर कारवाई सुरू केली. शुक्र वारी तीन बोगस डॉक्टरांवर कारवाई करून तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




नालासोपारा पूर्वेकडील संतोष भवन परिसरातील वालई पाड्यात बोगस डॉक्टर काही कागदपत्रे नसताना आपले बस्तान मांडून बसल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांना मिळाल्यानंतर डॉ. सुधीर पांढरे, डॉ. स्वाती चिंचोळकर, डॉ. जगदीश महाजन, डॉ. अनया देव आणि डॉ. शाहीन शेख यांच्या पथकाने त्यांच्या क्लिनिकमध्ये छापा घातला. पालिकेच्या या कारवाईचे येथील नागरिकांनी स्वागत केले आहे. या बोगस डॉक्टरांकडून सामान्यांच्या आरोग्याशी खेळ सुरू होता अशी संतप्त प्रतिक्रिया उमटू लागली आहे.

***कागदपत्रेच नाहीत***

वालई पाडा येथील हरी ओम साई क्लिनिक दवाखाना उघडून बसलेल्या डॉ. संजयकुमार बीनदेश्वरी साहू (५०) आणि डॉ. सुनीता संजयकुमार साहू (४१) या पतीपत्नीकडे कागदपत्रे नसल्यामुळे गुन्हा दाखल केला आहे. तर डॉ. सतीशकुमार सदानंद शर्मा (४१) याच्यावरही कारवाई करण्यात आली आहे.

# 'एनडीए'च्या नावावर टिव-टिव करणारे, त्यावेळी गोधडीत रांगतही नव्हते



**राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबत सत्तास्थापनेच्या तयारीत असलेल्या शिवसेनेला 'एनडीए'तून बाहेर काढण्यात आल्याची घोषणा भाजपाने रविवारी केली. विशेष म्हणजे शिवसेनेच्या खासदारांची बसण्याची जागाही विरोधी बाकांवर करण्यात आली आहे. भाजपाकडून करण्यात आलेल्या घोषणेला शिवसेनेचे नेते खासदार संजय राऊत यांनी 'एनडीए'च्या स्थापनेची हकिकत सांगत खरमरीत उत्तर दिलं आहे. 'एनडीएच्या नावावर टिवटिव करणारे, त्यावेळी गोधडीत रांगतही नव्हते,' अशी टीका राऊत यांनी केली आहे.**

मुख्यमंत्रीपदावर चर्चा करण्यास नकार दिल्यानंतर शिवसेनेनं राज्यात भाजपापासून दूर जाण्याचा मार्ग निवडला. शिवसेनेच्या या पावलामुळं १०५ आमदार असूनही भाजपाला सत्तेपासून वंचित राहावं लागले आहे. तर शिवसेनेनं राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबत सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीनं बोलणी सुरू केली. त्यानंतर भाजपानं शिवसेना 'एनडीए'त नसल्याची घोषणा रविवारी केली. भाजपाकडून करण्यात आलेल्या घोषणेचा खासदार संजय राऊत यांनी समाचार घेतला आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनासाठी खासदार संजय राऊत दिल्लीत दाखल झाले आहे. एबीपी माझा वृत्तवाहिशी बोलताना राऊत म्हणाले, 'शिवसेना 'एनडीए'चा संस्थापक घटक पक्ष आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे एनडीएचे संस्थापक होते. जॉर्ज फर्नांडीस निमंत्रक होते. फर्नाडीस हे 'एनडीए'तील सर्व घटक पक्षांशी संवाद साधायचे. 'एनडीए'च्या नावानं टिव-टिव करणारे ज्यावेळी एनडीए स्थापन झाली, तेव्हा गोधडीत रांगतही नव्हते,'अशी बोचरी टीका राऊत यांनी केली.

शिवसेनेला एनडीए बाहेर काढल्याच्या प्रश्नावर बोलताना राऊत म्हणाले,'जॉर्ज फर्नाडीस हे शेवटचे निमंत्रक होते. त्यानंतर कुणीच झाले नाही. सध्या एनडीएचे नेते कोण आहेत? कुणाच्या सहीने शिवसेनेला बाहेर काढले?,' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. 'एनडीए एका पक्षाची नाही. भाजपा मोठा पक्ष आहे. तो मोठा राहावा. पण एनडीएचे प्रमुख कोण आहेत. शिवसेनेला बाहेर काढताना कुणाला विचारल का. नितीश कुमार जाऊन येऊन एनडीएत असतात. आधी बैठक घ्यायला हवी होती. शिवसेनेनं चुकीच पाऊल उचललं असेल तर आम्ही आमची भूमिका मांडली असती. पण शिवसेनेला एनडीएतून बाहेर काढण्याची घोषणा योगायोग नाही. हे जाणूनबुजून घडवून आणलेलं क्रौर्य आहे,'असं राऊत म्हणाले.

# मराठी माणसाला 'सर्वोच्च' स्थान

## 'सरन्यायाधीश'पदी शरद बोबडे विराजमान



**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाचे सर्वात ज्येष्ठ न्यायाधीश न्या. शरद अरविंद बोबडे यांनी भारताचे ४७ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी बोबडेंना गोपनियतेची शपथ दिली. त्यानंतर, शरद बोबडेंनी सभागृहात उपस्थित सर्वांना अभिवादन करुन आभार मानले. स्वीकारतील. न्या. बी. पी. गजेंद्रगडकर व न्या. यशवंत चंद्रचूड यांच्यानंतर न्यायसंस्थेतील या सर्वोच्च पदाचा मान महाराष्ट्राला तिसऱ्यांदा मिळाला आहे. शरद बोबडेंच्यारुपाने मराठमोळा माणूस देशातील न्यायव्यवस्थेच्या 'सर्वोच्च' स्थानी विराजमान झाला आहे.

राष्ट्रपती भवनात साध्या समारंभात राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी न्या. बोबडेंना सत्य आणि गोपनियतेची शपथ दिली. सन २०१३ मध्ये सर्वोच्च न्यायालयात नियुक्त झालेल्या न्या. बोबडे यांची सरन्यायाधीशपदाची कारकिर्द सुमारे दीड वर्षाची असेल. वयाची ६५ वर्षे पूर्ण होतील तेव्हा म्हणजे २३ एप्रिल २०२१ रोजी ते निवृत्त होतील. आधीचे सरन्यायाधीश न्या. रंजन गोगोई सुमारे १३ महिन्यांच्या कारकिर्दीची ऐतिहासिक अयोध्या निकालाने सांगता करून रविवारी सायंकाळी निवृत्त झाले. आपले उत्तराधिकारी म्हणून न्या. बोबडे यांच्या नावाची शिफारस महिनाभरापूर्वी त्यांनी केली होती. त्यानुसार ३० ऑक्टोबर रोजी राष्ट्रपतींनी न्या. बोबडे यांची १८ नोव्हेंबरपासून सरन्यायाधीश म्हणून नेमणूक केली होती.

सरन्यायाधीश शरद बोबडे यांच्या निमित्ताने तब्बल साडेतीन दशकांनंतर मराठी माणूस सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदाची सूत्रे स्वीकारणार आहे. या क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी महाराष्ट्रातील विधी क्षेत्र राजधानी दिल्लीत दाखल झाले आहेत. सरन्यायाधीश शरद बोबडे यांचे कुटुंबीय, नातेवाईक व मित्र मंडळींची उपस्थिती या सोहळ्यात लक्षणीय ठरली. बोबडेंनी सरन्यायाधीशपदाची शपथ घेतल्यानंतर आपल्या आईच्या पाया पडून आशीर्वाद घेतले.

# 'मोदी सरकार मार्च अखेरपर्यंत एअर इंडिया अन् भारत पेट्रोलियम विकणार'



**नवी दिल्ली - अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी भारत पेट्रोलियम आणि एअर इंडियाच्या विक्रीबाबत मोठं विधान केलं आहे. एअर इंडियाच्या विक्रीची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच गुंतवणूकदारांमध्ये उत्साह पाहायला मिळत आहे. त्यामुळे लवकरात लवकरच या दोन्ही कंपन्यांच्या विक्रीची प्रकिया पूर्ण व्हावी, असे सरकारला वाटत आहे. म्हणून मार्च अखेरपर्यंत या दोन्ही कंपन्यांची विक्री करण्याचा विचार सरकार करत असल्याचं निर्मला सितारमण यांनी सांगितलंय.**

सितारमण यांनी टाईम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत याबाबतचा खुलासा केला. मार्च महिनाअखेरपर्यंत एअर इंडिया आणि भारत पट्रोलियम या कंपन्यांच्या विक्रीची प्रकिया पूर्ण होईल, असे त्यांनी म्हटले. चालू आर्थिक वर्षात करसंकलनात झालेली घट पाहून निर्गुंतवणूक आणि धोरणात्मक विक्रीच्या माध्यमातून महसूल गोळा करण्याचा सरकारचा विचार आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचा उत्साह असल्याचंही सितारमण यांनी सांगितलं.

आर्थिक मंदीचे मळभ दूर करण्यासाठी वेळेवर आवश्यक पावले उचलण्यात आली आहेत. अनेक क्षेत्र या मंदीतून सावरत आहेत. आपलं ताळेबंद सुधारा असं अनेक उद्योगांच्या मालकांना सांगण्यात आलं असून, त्यातील अनेकांनी नवी गुंतवणूक करण्याची तयारी सुरू केली आहे, असे सांगत देशातील आर्थिक मंदीवरही सितारमण यांनी भाष्य केलं.

# बोटांच्या ठशांवरून घरबसल्या करता येणार आर्थिक व्यवहार

**पुणे:** एटीएम, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड शिवाय केवळ बोटांच्या ठशांचा वापर करून बँकेशी निगडीत आर्थिक व्यवहार करता येईल,असे सर्व आयटी दृष्ट्या सक्षम व हॅक न करता येणारे आधुनिक बायोमेट्रिक उपकरण सावित्रीबाई फुले पुणेविद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाने तयार केले आहे. या उपकरणाच्या माध्यमातून ग्राहकांना पुढील काळात बोटाचे ठसे देवून घर बसल्याही आर्थिक व्यवहार करता येणे शक्य होणार आहे.

विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाने बायेमेट्रिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण संशोधन केले असून तांत्रिकदृष्ट्या पूर्णपणे सक्षम बायोमेट्रिक उपकरण तयार केले आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहार करण्यासाठी आता केवळ हाताच्या बोटांचे ठसे पुरेसे ठरणार आहेत.

याबाबत अधिक माहिती देताना विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ.आदित्य अभ्यंकर म्हणाले,विभागाने तयार केलेले उपकरण हे आधार सव्हरशी जोडण्यात आले आहे. आधारच्या सव्हरवरून संबंधित व्यक्तीच्या बोटाचे ठसे जुळत असल्याचा संदेश उपकरणावर आल्यानंतर आर्थिक व्यवहाराची प्रक्रिया सुरू होते. प्लास्टिक,जिलेटिन किंवा डेंटल मटेलिअर पासून तयार केलेल्या



कोणत्याही कृत्रिम हाताच्या बोटांच्या ठशांचा वापर करून हे उपकरण हॅक करता येणार नाही.याबाबतची तंत्रज्ञान विभागाने काळजी घेतली आहे

अभ्यंकर म्हणाले,या उपकरणाकडून बोटांमधील जिवंतपणा (लाईव्हनेस) तपासला जातो.त्यामुळे कोणत्याही कृत्रिक बोटांच्या ठशांचा वापर करून आर्थिक व्यवहार करणे कोणालाही शक्य होणार नाही.आधार सव्हरने ठसे तपासून दिल्यानंतर बॅकेचे काही प्रोटोकॉल ग्राहकांना पूर्ण करावे लागतील. त्यानंतर कोणत्याही बँकेच्या ग्राहकांना पैसे काढता येतील,अशा प्रकारची सुविधा देणारे आधुनिक उपकरण विद्यापीठाने तयार केले आहे.

सध्या स्टेट बँक ऑफ इंडियाने बायोमेट्रिक उपकरण ग्राहकांना उपलब्ध करून देण्याबाबत तयारी सुरू केली आहे. त्यासाठी बँकेने विद्यापीठाकडून काही उपकरणे तपासणीसाठी घेतले आहेत. या उपकरणांवर थंड व उष्ण वातावरणात चाचणी घेण्याचे काम सुरू आहे. त्याचप्रमाणे तांत्रिकदृष्ट्या उपकरण किती सक्षम आहे. हे सुद्धा बँकेकडून विविध स्तरावरून तपासले जात आहे. बँकेने बायोमेट्रिक उपकरण घेण्यास प्राथमिक तयारी दर्शविली आहे.परंतु,किती उपकरणे खरेदी करणार याबाबतची कल्पना दिलेली नाही.मात्र,विद्यापीठ किती उपकरणे व कोणत्या कंपनीच्या सहकायार्तून तयार करून दिली जाणार आहेत,याबाबतची माहिती विद्यापीठातर्फे बँकेला नुकतीच कळविण्यात आली आहे,असेही अभ्यंकर यांनी सांगितले.

# किशोरी पेडणेकर होणार मुंबईच्या नव्या महापौर



**मुंबईः शिवसेनेच्या ज्येष्ठ नगरसेविका किशोरी पेडणेकर यांना मुंबईच्या नव्या महापौर होणार आहेत. शिवसेनेकडून त्यांनी महापौरपदाच्या उमेदवार म्हणून सोमवारी अर्ज भरला आहे. पेडणेकर या पालिकेतील ज्येष्ठ नगरसेविका असून त्यांनी पालिकेच्या विविध पदांवर काम केलं आहे. आक्रमक नगरसेविका म्हणूनही त्या प्रसिद्ध आहेत. तर उपमहापौरपदासाठी शिवसेनेचे सुहास वाडकर यांनी अर्ज भरला आहे.**

येत्या २२ नोव्हेंबर रोजी महापौरपदाची निवडणूक होणार आहे. मुंबईचं महापौरपद खुल्यावर्गासाठी राखीव झाल्याने या पदासाठी शिवसेनेतील अनेक नगरसेवकांनी लॉबिंग सुरू केली होती. काही नगरसेवकांनी पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी संपर्क साधून त्यांची सेटिंग लावण्याचेही प्रयत्न केले होते. मंगेश सातमकर, यशवंत जाधव, विद्यमान सभागृह नेत्या विशाखा राऊत, शीतल म्हात्रे, बाळा नर, रमाकांत रहाटे, सुजाता पाटेकर आदी नगरसेवकांनी महापौरपदासाठी फिल्डिंग लावली असली तरी या सर्वांवर किशोरी पेडणेकर यांनी मात केली आहे. पालिकेत महापौरांच्या दालनात शिवसेना सचिव अनिल परब यांची महापौर आणि सेना नगरसेवकांसोबत बैठक झाली. त्यात पेडणेकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. आज सकाळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांना मातोश्रीवर बोलावून पेडणेकर यांना महापौरपद देण्यात येत असल्याचं सांगितलं होतं, असंही सूत्रांनी सांगितलं. दरम्यान, आज दुपारी महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांनी महापौरपदासाठी किशोरी पेडणेकर आणि उपमहापौरपदासाठी सुहास वाडकर यांच्या नावाची घोषणा केली.

# राष्ट्रपती राजवटीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष बंद झाल्याने रुग्णांचे हाल

**मुंबई -** राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाल्याने प्रशासनाच्या कामावर त्याचा परिणाम दिसू लागला आहे. राष्ट्रपती राजवटीमुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष बंद करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील हजारो रुग्णांना शासनाकडून मिळणारी वैद्यकीय मदत बंद झाली आहे. यामुळे बंद करण्यात आलेला निधी कक्ष तातडीने सुरू करण्याबाबत धनंजय मुंडे यांनी राज्यपालांना पत्र लिहले आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष बंद झाल्याने, राज्यातील हजारो रुग्णांना शासनाकडून मिळणारी वैद्यकीय मदत देखील बंद झाली आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, आमदार धनंजय मुंडे यांनी, राज्यातील गरीब रुग्णांना दिलासा देण्यासाठी हा कक्ष पुन्हा सुरू करावा, यासाठी राज्यपालांना पत्र लिहत विनंती केली आहे. धनंजय मुंडे यांनी स्वतः या पत्राबाबत ट्विट करत ही माहिती दिली.धनंजय मुंडे आपल्या पत्रात म्हटले आहे की, 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष बंद झाल्याने गरीब रुग्णांसमोर आर्थिक समस्या निर्माण झाली आहे. राष्ट्रपती राजवटीत शासनाचा कारभार सुरू ठेवण्याची जबाबदारी घटनेने आपल्यावर दिली आहे. आपल्या अनुमतीने हा कक्ष पुन्हा सुरू करून हजारो रुग्णांना दिलासा द्यावा' अशी विनंती या पत्राद्वारे केली आहे. राज्यपाल महोदय या पत्राची दखल घेत हजारो गरीब रुग्णांना दिलासा देतील, अशी अपेक्षा मुंडे यांनी आपल्या ट्विटमध्ये व्यक्त केली आहे.



# ३१ डिसेंबरपर्यत आधारशी लिंक करा तुमचं रेशन कार्ड; मिळेल 'हा' फायदा

**नवी दिल्ली :** देशात 'वन नेशन, वन रेशन कार्ड' (One nation one ration card) योजना पुढील वर्षी १ जूनपासून सुरु होणार आहे. पण त्यासाठी ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत रेशन कार्ड, आधार कार्डशी लिंक करणं आवश्यक आहे. असं न झाल्यास रेशन कार्ड धारकांसाठी मोठी समस्या निर्माण होऊ शकते. रेशन कार्ड, आधार कार्डशी लिंक केल्यानंतर ग्राहक देशभरात कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही रेशन दुकानातून सामान खरेदी करु शकतात.



केंद्रीय मंत्री रामविलास पासवान यांनी, 'वन नेशन, वन रेशन कार्ड' या योजनेमुळे रेशन दुकानदार ग्राहकांशी कोणतीही मनमानी करु शकणार नाही. यामुळे रेशन दुकानदाराला ग्राहकांचं समाधान करणं आवश्यक असल्याचं ते म्हणाले. रेशन कार्डधारक कोणत्याही रेशन दुकानदाराकडून सामान खरेदी करु शकतील.

रेशन दुकानातून स्वस्त दरातील धान्य घेणं हा ग्राहकांचा हक्क आहे आणि त्यांना सुविधा पुरवणं ही संबंधित दुकानदाराची जबाबदारी असल्याचं एका अधिकाऱ्याने सांगितलं. रामविलास पासवान यांनी, १ जून २०२० पासून संपूर्ण भारतात 'वन नेशन, वन रेशन कार्ड' लागू करण्यात येणार असून, या योजनेच्या अंमलबजावणीनंतर, रेशन कार्डधारक देशात कुठेही आपल्या वाट्याचे स्वस्त धान्य खरेदी करु शकत असल्याचं ते म्हणाले. देशात जवळपास १४ ते १५ राज्यातील विविध ठिकाणी याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. देशातील विविध राज्यांत, रेशन कार्डसह ग्राहकांच्या आधारकार्डचा तपशील ऑनलाईन करण्यात आला आहे.

# प्रसिद्ध पार्श्व गायिका गीता माळी यांचे अपघाती निधन



प्रसिद्ध मराठी गायिका गीता माळी यांचे शहापूरजवळ अपघाती निधन झाले आहे. मूळच्या नाशिकच्या असणाऱ्या गीता या मागील काही महिन्यांपासून अमेरिकेमध्ये होत्या. भारतात परतल्यानंतर नाशिकला जाताना मुंबई-आग्रा महामार्गावर शहापूरजवळ त्यांच्या गाडीला अपघात झाला. त्या ३७ वर्षांच्या होत्या. या अपघातामध्ये त्यांचे पती गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. बऱ्याच दिवसांनी भारतात परतल्याबद्दल त्यांनी फेसबुक पोस्टवरुन आनंद व्यक्त केला होता. घरी परतल्याबद्दल आनंद व्यक्त करणारी त्यांची ही फेसबुक पोस्ट शेवटची ठरली.

मागील तीन महिन्यापासून गीता या अमेरिकेच्या दौऱ्यावर होत्या. गुरुवारी सकाळी त्या मुंबईमध्ये दाखल झाल्या. मुंबई विमानतळावरुन पती ॲड. विजय माळी यांच्यासोबत त्या नाशिकच्या दिशेने रवाना झाल्या. दुपारी तीनच्या सुमारास शहापूरमधील लाहे फाटा येथे रस्त्यावरील एका कुत्र्याला वाचवण्याच्या नादात त्यांची गाडी रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या इंधनाच्या टँकरला जाऊन धडकली. तातडीने या दोघांनाही शहापूरमधील ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. मात्र तेथे गीता यांना मृत घोषित करण्यात आले. गीता यांच्या पश्चात आई, वडील, दोन भाऊ, सासु-सासरे, पती विजय, मुलगा मोहित असा परिवार आहे.

सकाळी मुंबई विमानतळावर उतरल्यानंतर गीता यांनी फेसबुकवर विमानतळावरील काही फोटो पोस्ट केले होते. यामध्ये त्यांनी भारतात परत आल्याचा आनंद व्यक्त केला होता. 'जननी जन्मभूमी स्वर्ग से महान है' असं म्हणत त्यांनी तिरंग्याचा इमोन्जी पोस्ट केला होता. दुर्दैवाने हिच त्यांची शेवटची फेसबुक पोस्ट ठरली.






हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)